कला अकादमी गोवा
कांपाल-पणजी
कअ/काविवि/भ.स्प/२०२४-२५/७६४
दि.०८/०७/२०२४

# कृपया प्रसिध्दीसाठी

## <u>मडकई-फोंडा येथील महिला भजन स्पर्धेच्या स्थळात बदल</u>

कला अकादमीने शुक्रवार दि. १२ व शनिवार १३ जुलै २०२४ रोजी लाडेवाडा, मडकई-फोंडा येथे आयोजित केलेल्या विभागीय महिला कलाकार भजन स्पर्धेचे स्थळ कांही अपरिहार्य कारणामुळे बदलण्यात आली असून आता सदर स्पर्धा करंजाळ, मडकई-फोंडा येथील करंजाळ, स्पोर्टस् ॲण्ड कल्चरल कल्बच्या सभागृहात स्थलांतरीत केली आहे. या स्पर्धेच्या आयोजनासाठी करंजाळ, स्पोर्टस् ॲण्ड कल्चरल कल्ब, यांचे सक्रिय सहकार्य लाभले आहे, तरी सर्व पथकांनी व भजनप्रेमी कलाकारांनी याची नोंद घ्यावी असे आवाहन कला अकादमीतर्फे करण्यात आले आहे.

विभागीय महिला भजन स्पर्धेचे हे तिसरे केंद्र असून खालील पथके त्यात सहभागी होणार आहे.

**दि.१२ जुलै रोजी होणा-या केंद्र क ३ व सत्र क. १** मध्ये श्री मदनंत सातेरी खामिणी महिला भजनी मंडळ, सावई-वेरे-फोंडा, साईनाथ महिला भजनी मंडळ, भोमा-फोंडा, श्री केळबाय सातेरी महिला भजनी मंडळ, कुर्टी-फोंडा, शांताई सेल्फ हेल्प ग्रुप, कुंकळये, म्हार्दोळ-फोंडा, श्री गडेश्वर महिला भजनी मंडळ, ढवळी-फोंडा, श्री साई समर्थ महिला भजनी मंडळ, सावई-वेरे-फोंडा, श्री सातेरी महालसा महिला भजनी मंडळ, म्हार्दोळ-फोंडा, श्री शांतादुर्गा रामनाथ महिला भजनी मंडळ, बांदोडा-फोंडा व श्री लक्ष्मी महिला भजनी मंडळ, वेलकास वाडा, सावई-वेरे-फोंडा ही पथके सहभागी होणार आहे.

**दि.१३ जुलै रोजी होणा-या केंद्र क ३ व सत्र क. २ मध्ये** श्री महालक्ष्मी महिला भजनी मंडळ, तिवरें, मार्शेल-फोंडा, श्री सातेरी खामिणी महिला भजनी मंडळ, बेतकी-फोंडा, युवती भजनी मंडळ, अडकोण, बाणास्तारी-फोंडा, श्री निवळेश्वर महिला भजनी मंडळ, मडकई-फोंडा, श्री. पांडुरंग ब्रह्मेश्वर मंडळ, आखाडा, सांतईस्तेंव्ह-तिसवाडी, श्री खामिणी प्रासादिक मंडळ केरी-फोंडा, श्री नागेश महारुद्र सातेरी महिला मंडळ म्हार्दोळ-फोंडा व श्री मदनंत खामिणी महिला भजनी मंडळ, सावई-वेरे-फोंडा ही पथके सहभागी होणार आहे.

स्पर्धेला दुपारी ठिक २.३० वाजता सुरुवात होणार असून प्रत्येक पथकाने आपले सत्र सुरु होण्याच्या अर्धा तास अगोदर सर्व कलाकारांसह स्पर्धेच्या ठिकाणी उपस्थित रहावे. स्पर्धेचा अनुक्रम चिठ्ठया टाकून ठरविण्यात येईल व तो सर्वांवर बंधनकारक राहील. सादरीकरणाचा अनुक्रम न पाळणा-या पथकांना भजन सादर करु दिले जाणार नाही व सदर पथक स्पर्धेतून बाद ठरविण्यात येईल याची सर्व पथकांनी दखल घेउन सहकार्य करावे असे आवाहन कला अकादमीने केले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड
७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)

एसझेड /एसएस